महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०१/११ वी १९-२०/पुवि/२०२० /3670
दिनांक :- 10 AUG 2020

प्रति,

मार्गदर्शन केंद्र प्रमुख,
इ.११ वी ऑनलाईन पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र
मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, इ.११ वी ऑनलाईन पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषयः- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२०-२१ मधील इ.११वी ऑनलाईन प्रवेशाचे अर्ज ॲप्रुव्ह (Verify) करणेबाबत ...

संदर्भः-१) शासन निर्णय क्रमांक-प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२ दि.२३.०६.२०२०.
२) या कार्यालयाने दिलेलया गुग्गल मिट बैठकीतील सूचना

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ चे कामकाज सुरु झालेले आहे, दि.०२.०७.२०२० पासून परदेशातुन, भारतातुन व महाराष्ट्र तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयासाठी विद्यार्थ्यी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरलेला आहे, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रातील माध्यमिक शाळांतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज भरलेला असतांना त्यांचा अर्ज ॲप्रुव्ह (Verify) करताना आपल्या माध्यमिक शाळेची निवड केलेली आहे, तसेच आपल्या शाळेतील लॉगईन वर सदरच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज ॲप्रुव्ह (Verify) साठी आलेले आहेत, तरी सदरच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज आज दि.११.०८.२०२० सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत नियमानुसार ॲप्रुव्ह (Verify) करावे.

इ.११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत यावर्षी (एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील (एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे) सर्व अर्ज By Defalut माध्यमिक शाळेच्या लॉग-इन ला ॲप्रुव्ह (Verify) करणेसाठी जाणार आहेत, ऑनलाईन प्रवेश अर्जाचे ॲप्रुव्ह (Verify) करवून घेणे ही जबाबदारी संबधित माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकाची आहे तसेच एस.एस.सी बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या व पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील एस.एस.सी. बोर्डाच्या मुलांचे अर्ज व्हेरीफिकेशनसाठी मार्गदर्शन केंद्राला जाणार आहेत व हे अर्ज व्हेरीफाय करावयाची जबाबदारी मार्गदर्शन केंद्राच्या प्रमुखाची आहे.

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचा इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाचा अर्ज ॲप्रुव्ह (Verify) न झाल्यास त्याला प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही, सबब कोणत्याही विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज ॲप्रुव्ह (Verify) न झाल्यास व त्याच्या प्रवेशासंबधी कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबधित माध्यमिक शाळेचे



Scanned with CamScanner

मुख्याध्यापक व मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख म्हणून आपली राहील, त्यामुळे आपल्या लॉगईन ला आलेले सर्व अर्ज तपासून ॲप्रुव्ह (Verify) करावेत सदरचे काम दिलेल्या वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याने आपल्या माध्यमिक शाळा/ मार्गदर्शन केंद्राच्या लॉगइन ला आलेले इ.११ वी ॲप्रुव्ह (Verify) करण्यासाठी चे अर्ज प्रलंबित राहिल्यास व विद्यार्थी इ.११ वी ऑनलाईन प्रवेशापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील याची नोंद घ्यावी .

(अनुराधा ओक)
अध्यक्ष
इ.११ वी विभागीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या माध्यमिक शाळा यांना इ.११ वी प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ साठी प्रवेशाचे अर्ज तात्काळ ॲप्रुव्ह (Verify) करण्यासाठी आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात यावे. इ.११ वी ऑनलाईन प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner